# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** जळगाव **P.S.(ठाणे):** चाळीसगांव

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0328 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**07/07/2026 23:02

2.

| **S.No. (अ.क्र.)** | **Acts (अधिनियम)** | **Sections (कलम)** |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार **Date From (दिनांक पासून):** 07/07/2026

**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 07/07/2026

**Time From (वेळेपासून):** 14:24 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 15:36 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 07/07/2026 **Time (वेळ):** 21:47 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 034

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 07/07/2026 22:47 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** जिल्हा परिषद विभागाचे उपविभागी, चाळीसगांव शहरातील,बांधकाम विभागाच्या कार्यालयाती

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** सचिन शालीकराव साळुंखे

(b) **Father's Name (वडील चे नाव) :** शालीकराव साळुंखे

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1986

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक ,विभाग, धुळे,चाळीसगांव ,जळगाव,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक ,विभाग, धुळे,चाळीसगांव ,जळगाव,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):** नोकरी

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9834202955

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | यथार्थ पांडुरंग निनावे | | वडील का नाम : पांडुरंग निनावे | 1. नुमानवाडी, अनाया,मेडीकल जवळचाळीसगांव,चाळीसगांव , जळगाव,महाराष्ट्र,भारत |
| 2 | कुलदिप विरुचंद गमे | | वडील का नाम : विरुचंद गमे | 1. धुळे रोड,चाळीसगांव,मोरया नगर,,चाळीसगांव ,जळगाव, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 7,000/रु हस्तगत केलेली रक्कम | 7,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

7,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी सचिन शालीकराव साळुंखे, वय 40 वर्षे, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे समक्ष पोलीस स्टेशनला हजर राहुन फिर्याद देतो की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे येथे पोलीस उप अधीक्षक या पदावर सुमारे दोन वर्षापासुन कार्यरत आहे. दि.07.07.2026 रोजी आम्ही दैनंदिन कर्तव्यावर हजर असतांना तक्रारदार पंकज शिवाजी पवार यांनी त्यांच्याकडे चाळीसगांव येथील जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता निनावे हे लाचेची मागणी.करीत असल्याची माहिती फोनद्वारे दिल्याने आम्ही मा. जिल्हा हिवतापrअधिकारी, धुळे यांना पत्र देवुन त्यांचेकडील श्री सतिष गंगाराम पाटील, आरोग्यsसेवक व श्री परशुराम शहाजी बोयने, आरोग्य सेवक यांना पंच म्हणुन उपलब्ध करुन घेतले तेव्हा आम्ही त्यांना आमची ओळख देवुन त्यांची ओळखकरुन घेतली. तसेच कार्यालयात हजर असलेले पोकॉ. मकरंद पाटील व पोकॉ. रामदास बारेला यांची ओळख करुन दिली.- त्यानंतर आम्ही, दोन्ही पंच, पोकॉ. मकरंद पाटील व पोकॉ. रामदास बारेला असे खाजगी वाहन क्रमांक एम.एच.15 केजी 5114 ने ला.प्र.वि. धुळे कार्यालयातुन रवाना होवुन चाळीसगांव येथील जिल्हा परिषद उपविभागीय बांधकाम कार्यालयासमोरुन जाणाऱ्या रस्त्यालगत काही अंतरावर पोहोचलो, तेथे ठरल्याप्रमाणे आम्हास तक्रारदार पंकज शिवाजी पवार भेटले. त्यांना वाहनात बसवुन घेवुन आम्ही तक्रारदारास त्यांचे नांव गांव विचारता त्यांनी त्यांचे नांव पंकज शिवाजी पवार, वय 37 वर्षे, व्यवसाय शेती व ठेकेदारी, रा. दहिवद, ता. चाळीसगांव, जि. जळगांव असे सांगुन त्यांनी त्यांचे तक्रारीची तोंडी हकीगत सांगितली, त्यानंतर तक्रारदार यांच्या सांगण्याप्रमाणे त्यांची तक्रार त्यांचे हस्ताक्षरात लिहुन घेण्यात आली ती ''मी मौजे दहिवद, ता. चाळीसगांव, जि. जळगांव येथील रहिवासी आहे. माझे मित्र श्री विनोद रतिलाल निकम, रा. चाळीसगांव, जि. जळगांव हे शासकिय ठेकेदार असुन त्यांनी मौजे दहिवद येथे ग्रामपंचायत 15 वा वित्त आयोग अंतर्गत गांवहाळ व रस्ता कॉक्रीटीकरणाचे कंत्राट घेतले होते. त्यांनी सदरचे काम मला करावयास दिले होते. त्याप्रमाणे मी सदरची कामे पुर्ण केल्यावर सदर कामांचे बिल अदा करण्याकरीता संबंधित कार्यालयात पाठपुरावा करणेकरीता मला माझे मित्र निकम यांनी अधिकारपत्र दिले होते.

मी मौजे दहिवद येथील गांवहाळ व रस्ता कॉक्रीटीकरणाचे काम पुर्ण केले आहे. सदर कामांचे मोजमाप होवुन मोजमाप पुस्तिकेत त्याच्या नोंदी व मुल्यांकन होवुन मोजमाप पुस्तिका झालेल्या रस्ता कॉक्रिटीकरण कामाचे 4,99,560/- रु. व 98,917/- रु. तसेच गांव हाळच्या कामाचे 4,49,366/- रु. असे एकुण 10,47,843/- रु. चे बिल अदा करण्याकरीता श्री यथार्थ निनावे, उपविभागीय अभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम विभाग, चाळीसगांव यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आली आहे. त्याबाबत मी दि.03.07.2026 रोजी उपविभागीय अभियंता श्री निनावे यांची त्यांच्या कार्यालयात जावुन भेट घेवुन मी केलेल्या कामाचे बिलाबाबत विचारणा केली असता त्यांनी, ''तुम्ही केलेल्या कामाचे बिलाच्या रकमेच्या एक टक्क्याप्रमाणे 10,500/- रु. द्यावे लागतील, तोपर्यंत कामांचे बिल निघणार नाही'' असे सांगुन ''पैसे दिल्याशिवाय मी बिले काढु देणार नाही'' असे मला सांगितले आहे. तेव्हा मी त्यांना ''नंतर भेटण्यास येतो'' असे सांगितल्याची लेखी तक्रार दिली. सदर तक्रार वाचुन तक्रारी अर्जावर व त्यासोबतच्या कागदपत्रांवर ◌आम्ही व दोन्ही पंचांनी सहया केल्या आहेत. त्यानंतर आम्ही तक्रारदार व पंचांशी चर्चा करुन तक्रारदार यांच्या तक्रारीची पडताळणी करण्याबाबत तक्रारदार व दोन्ही पंचांना सविस्तर सुचना दिल्या. त्यानंतर आमचे सुचनेवरुन पोकॉ. रामदास बारेला यांनी डिजिटल व्हॉईस

रेकॉर्डर सुरु करुन तक्रारदार यांच्याकडे देवुन तक्रारदार व पंच नं. 01 सतिष पाटील अशांना यथार्थ निनावे यांची भेट घेण्यासाठी चाळीसगांव येथील जि.प. उपविभागीय बांधकाम कार्यालयात पायी रवाना केले. त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच नं. 01 पाटील असे आमचे जवळ परत आले. तेव्हा पंच नं. 01 पाटील यांना विचारणा केली असता त्यांनी "मी व तक्रारदार असे आपल्या पासुन पायी रवाना होवुन कार्यालयात गेलो. तेथे कार्यालयाच्या पहिल्या मजल्यावरील कक्षात समोर खुर्चीवर बसलेल्या इसमाकडे इशारा करुन ते यथार्थ निनावे असल्याचे सांगितले. तेव्हा मी व तक्रारदार कक्षात गेलो. तेव्हा तक्रारदार यांनी निनावे यांची भेट घेतली. तेव्हा त्यांच्यात तक्रारदार यांनी केलेल्या कामाच्या बिलाबाबत चर्चा झाली. तेव्हा निनावे यांनी तक्रारदार यांना एक टक्क्याप्रमाणे 10,000/- रुपये द्यावे लागतील असे सांगितले. तेव्हा तक्रारदार यांनी पैसे जास्त होतात असे सांगितल्यावर निनावे यांनी 8,000/- रुपये देण्यास सांगितले. तेव्हा तक्रारदार यांनी 7,000/- रुपये देतो असे सांगितल्यावर निनावे यांनी 7,000/- रुपये स्विकारण्याचे मान्य करुन यापुढे एक टक्क्याप्रमाणेच पैसे द्यावे लागतील असे सांगितले, त्यानंतर आम्ही आपणाकडे परत आलो" अशी हकिगत सांगितली. तसेच तक्रारदार यांनी देखील पंच नं. 01 पाटील यांचे सांगणेप्रमाणेच हकिगत सांगितली. सदरची हकिगत व डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर मधील ध्वनीमुद्रित झालेले संभाषण ए◌ेकुन आमची व पंचांची यथार्थ निनावे यांनी तक्रारदार यांचेकडे तडजोडीअंती 7,000/- रुपये लाचेची मागणी केल्याची खात्री झाली.

त्यानंतर आम्ही निनावे यांचेवर सापळा लावण्याचा निर्णय घेतला. तेव्हा तक्रारदार यांनी सापळा कारवाईकामी त्यांच्याकडे उपलब्ध असलेले 7,000/- रुपये त्यात 500/- रुपये दराच्या 14 नोटा काढुन सदर चलनीय नोटांना पावडर लावुन सापळापुर्व कार्यवाही करुन लाचेची रक्कम तक्रारदार यांच्या पॅन्टच्या उजव्या खिशात ठेवली. त्यानंतर आम्ही तक्रारदार व पंचांना सापळा कारवाईबाबत सुचना देवुन तक्रारदार यांच्याकडे डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन देवुन तक्रारदार व पंच नं. 01 पाटील अशांना पायी यथार्थ निनावे यांना पैसे देण्याकरीता त्यांच्या कार्यालयात रवाना केले. त्यांचे पाठोपाठ आम्ही, पंच नं. 2 परशुराम बोयने, पोकॉ. रामदास बारेला, पोकॉ. मकरंद पाटील यांचेसह पायी चालत जावुन उपविभागीय बांधकाम विभागाच्या कार्यालयाच्या परिसरात सापळा लावला. काही वेळाने तक्रारदार यांनी कार्यालयाचे पहिल्या मजल्यावरुन ठरवुन दिलेला इशारा केला. तेव्हा सापळा पथक त्यांचेजवळ पोहोचलो. तेव्हा पोकॉ. रामदास बारेला यांनी तक्रारदार यांचेकडील डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर काढुन बंद केले. तेव्हा आम्ही पंच नं. 1 यांना विचारणा केली. तेव्हा त्यांनी समोरच खुर्चीवर बसलेले यथार्थ निनावे असुन त्यांच्या कक्षात उभे असलेले कुलदिप गमे असल्याचे सांगुन, निनावे यांनी तक्रारदार यांचेशी त्यांच्या कामाबाबत चर्चा केली. तेव्हा निनावे यांनी कार्यालयातील शेंडे यांना आवाज देण्यास सांगितले. तेव्हा तक्रारदार यांनी शेंडे कार्यालयात नसल्याचे सांगितले. तेव्हा निनावे यांनी इशा-याने कक्षा समोरच उभे असलेल्या गमे यांच्याकडे पैसे देण्यास सांगितले. तक्रारदार यांनी त्यांच्या पॅन्टच्या उजव्या खिशातील लाचेची रक्कम बाहेर काढुन गमे यांच्या समोर धरली असता गमे यांनी त्यांच्या उजव्या हाताने लाचेची रक्कम स्विकारुन त्यांच्या पॅन्टच्या मागील उजव्या खिशात ठेवली तेव्हा तक्रारदार यांनी ठरवुन दिलेला इशारा केला. अशी हकिगत सांगितली. त्यानंतर आमचे सुचनेवरुन पोकॉ. रामदास बारेला यांनी कुलदिप गमे यांचे मनगटापासुन हात धरुन त्यांना अटकावुन ठेवले. तसेच आमचे सांगणेवरुन पो.कॉ. मकरंद पाटील यांनी उपविभागीय अभियंता यथार्थ निनावे यांना ताब्यात घेतले. त्यानंतर पंच नं. 02 यांचेकरवी कुलदिप गमे यांचेकडुन लाचेची रक्कम हस्तगत करण्यात आली. त्यानंतर कक्षात कुलदिप गमे, तक्रारदार व पंच नं. 02 यांच्या हातावर ए◌ॅन्थ्रा◌ासिन पावडरची अल्ट्राव्हायलेट दिव्याची तपासणी केली. तसेच कुलदिप गमे यांचेकडुन हस्तगत केलेल्या नोटांची देखील तपासणी करण्यात आली. त्यानंतर तक्रारदार यांच्या तक्रारीवरुन झालेल्या संपुर्ण कार्यवाहीचा ला.प्र.वि. धुळे कार्यालयात जावुन सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

अशा प्रकारे तक्रारदार पंकज शिवाजी पवार यांनी केलेल्या कामांची बिले ठेकेदारास अदा करण्यासाठी लोकसेवक यथार्थ पांडुरंग निनावे, उपविभागीय अभियंता (वर्ग 01), जिल्हा परिषद, बांधकाम उपविभाग, चाळीसगांव, जि. जळगांव यांनी एकुण बिलाच्या एक टक्क्याप्रमाणे 10,000/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती 7,000/- रुपये लाच स्विकारण्याचे मान्य करुन आज दि.07.07.2026 रोजी सापळा कारवाई दरम्यान चाळीसगांव शहरातील जिल्हा परिषद उपविभागीय बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता यांचे कक्षात यथार्थ निनावे यांचे सांगण्यावरुन कुलदिप विरुचंद गमे, स्थापत्य अभियांत्रिकी सहायक, जिल्हा परिषद, बांधकाम विभाग, चाळीसगांव, जि. जळगांव यांनी 7,000/- रुपये लाचेची रक्कम स्विकारुन त्यांनी स्वत:चे आर्थिक फायद्यासाठी भ्रष्ट व बेकायदेशिर मार्गाचा अवलंब करुन अनाधिकाराने पदाचा दुरुपयोग केला म्हणुन त्यांचेविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलम 7 व 12 प्रमाणे माझी कायदेशिर फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

Amitkumar rohidas Manel(I (Inspector)) / PI **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

**Registered by (नोंदणी अधिकारी)**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** Amitkumar rohidas I
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** PI

पो. ठा अंमलदार
चाळीसगांव शहर पो. स्टे
जि. जळगांव

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

**15. Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**